# ग्रामीण महिलांचे सामाजिक व राजकीय सक्षमीकरण

**प्रा. प्रदीप दाजीबा पाटील**

**समाजशास्त्र विभाग प्रमुख,**

**श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा,**

**जि. उस्मानाबाद.**

प्रस्तावना :-

'महिला सक्षमीकरण' ही स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने विकासाच्या संधी उपलब्ध करुन देणारी, स्त्री अधिकाराचा पुरस्कार करणारी आणि स्त्री-पुरुष समानतेवर आधारीत नवीन व्यवस्था निर्मितीचे उद्दिष्ट ठेवणारी एक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमध्ये स्त्रियांचा शारिरीक, मानसिक व बौद्धीक विकास साधून त्यांना जीवनाच्या सामाजिक आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क आणि अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न केला जातो. स्त्री सक्षमीकरणाच्या संदर्भात आजतागायत विविध घटकांच्या माध्यमातून प्रयत्न केले गेलेले आहेत. अगदी छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून स्त्रियांना सन्मानाची वागणूक मिळावी आणि स्त्रीयांचा उत्कर्ष व्हावा ही भुमिका निर्माण केली. त्यानंतरच्या कालखंडात राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, राजा राममोहन रॉय, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी अनेक समाजसुधारक, विचारवंतांनी स्त्री स्वातंत्र्य आणि त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते. या प्रयत्नांना राष्ट्राभिमान, स्वातंत्र्य चळवळ, आणि सर्वांगिण शिक्षण या गोष्टीची जोड मिळाल्याने मोठया प्रमाणात स्त्रीयांवरील बंधने, अन्याय, अत्याचार दूर होण्यास मदत झाली. अनेक वर्षापासून 'चूल आणि मूल' या कार्यक्षेत्रात अडकलेल्या व माणुस म्हणूनही जगता न येणारी आगतिकता वर्षानुवर्षे भोगणाज्या स्त्रीसाठी ही एक स्वातंत्र्याची पहाटच म्हणावी लागेल. महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेमुळे महिलांचे विविध क्षेत्रात कर्तुत्व दाखविण्याची संधी मिळू लाल्याने महिलांचे नेतृत्व उदयास येत आहे.

प्राचीन भारतात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान होते. गार्गी, मौत्रेयी व अत्रेयी यांना तर विदूषी म्हणून विद्वतसभेमध्ये मानाची जागा मिळत असे. प्राचीन भारतात स्त्रीचा मान राखला जात असे. पण मध्ययुगीन काळात परकीय आक्रमणे वाढली आणि सुरक्षित असलेली स्त्री असुरक्षित झाली. ब्रिटीश आणि स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री सुधारणेसाठी वेळोवेळी कायदे करण्यात आले. गेल्या पाच दशकात त्यामध्ये बदल झालेला आपणास दिसतो आहे. महिला विविध क्षेत्रात आघाडीवर दिसू लागल्या असल्या तरी त्यांचे प्रमाण हे काही क्षेत्रात नगण्य, अल्प व नाममात्र आहे. महिलांच्या क्षमतांचा उपयोग पूर्णपणे केला गेल्यास समाजाची उन्नती होईल व समाजाचा प्रन्नास टक्के घटक स्त्रिया असल्याने पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांचाही विकास झाला तरच पूर्ण समाज विकसित होईल. त्यासाठी महिलांचा विकास किंवा महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासनाला विविध कायदे नियम अधिनियम, धोरणे, कार्यक्रम आखून महिलांचे सक्षमीकरण केले जात असल्याने महिलांचे नेतृत्त्व पुढे येत आहे. विशेषत: कौटुंबिक पातळीवरुन निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग वाढल्याने महिला सक्षमीकरणाला बळकटी प्राप्त होत आहे. पुढे आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातही नेतृत्त्व करण्याची संधी मिळू लागल्याने महिलांचे सक्षमीकरण होत आहे. प्रस्तूत शोधनिबंधात त्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

ज् शोधनिबंधाचे उद्देश :

१) महिला सक्षमीकरण ही संकल्पना समजावून घेणे.

२) ग्रामीण महिलांच्या राजकीय स्थितीचा आढावा घेणे.

३) ग्रामीण महिलांच्या सामाजिक स्थितीचा आढावा घेणे.

ज् शोधनिबंधाची गृहीतकृत्ये :

१) महिलांना विविध क्षेत्रात नेतृत्त्व करण्याची संधी मिळाल्याने महिला सक्षमीकरण घडून येत आहे.

२) राजकारणातील आरक्षणामुळे महिलांचे नेतृत्त्व उदयास येत आहे.

३) सामाजिक जाणीव जागृतीमुळे महिलांची सामाजिक स्थिती सुधारली आहे.

ज् संशोधन पद्धती :-

प्रस्तूत शोधनिबंधासाठी शास्त्रीय संशोधनातील नियमांप्रमाणे तथ्यसंकलन करताना दुय्यम तथ्यांचा आधार घेण्यात आला आहे. त्यासाठी विषयांशी संबंधीत संदर्भ ग्रंथ, मासिके, इंटरनेट व वर्तमान पत्रातील बातम्या व लेख इत्यादीचा आधार घेण्यात आलेला आहे. व त्या आधारेच संशोधन विषयाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

ज् महिला सक्षमीकरण: एक संकल्पना

'सक्षमीकरण' ही एक बहुआयामी संकल्पना आहे. अशा व्यापक व गुंतागुंतीच्या स्वरुपामुळे महिला सक्षमीकरणाची नेमकेपणाने व्याख्या करता येत नाही. तरीही एखाद्याला त्यांच्या जिवनासंबंधीचे हक्क प्राप्त करुन घेण्यासाठीची पात्रता त्यांच्यात निर्माण करणे यालाच सक्षमीकरण असे म्हंटले जाते. 'सक्षमीकरण' ही दुर्बलता नष्ठ करणारी संकल्पना आहे. महिला सक्षमीकरण ही संकल्पना सर्वप्रथम 'पावलो फिरे' यांनी मांडली. ती स्त्रीयांच्या विकासाशी संबंधीत आहे. १९८० च्या दशकात सुरुवातीला महिला कल्याणांवर भर दिला गेला. १९९० च्या दशकात स्त्री पुरुष समानतेवर भर दिला गेला. याच दशकाच्या शेवटी महिला सक्षमीकरण शब्दांचा प्रयोग करण्यात आला. कोणतेही राष्ट्र आपल्या राष्ट्रातील स्त्री-पुरुषांच्या विकासाद्वारेच राष्ट्रांचा सर्वांगिन विकास करु शकते. राष्ट्रांच्या विकासामध्ये स्त्रीयांचा विकास आणि त्याचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते. स्त्रियांच्या विकासासाठी महिला सक्षमीकरण आवश्यक आहे.

ज् महिला सक्षमीकरणाचा अर्थ :-

'पावलो फिरे' या विचारवंतानी 'महिला सक्षमीकरण' ही संकल्पना सर्वप्रथम मांडून अबला महिलांना सबला करण्यासाठी त्यांना समान संधी देण्याचा विचार मांडला. महिला सक्षमीकरण म्हणजे महिला केवळ शारीरिकदृष्टया निरोगी व सदृढ असणे असे नाही. तर सामाजिक व अर्थिकदृष्टया स्त्रियांवरील अन्याय व अत्याचार दूर करुन त्यांना न्याय मिळवून देणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय.

'महिलांना सामाजिक आर्थिक, राजकीय, कौटूंबिक, मानसिक व प्रशासकीय क्षेत्रात योग्य प्रमाणात सहभागी करुन घेणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय." असेही म्हंटले जाते. लता बाटलीवाला यांनी तर सक्षमीकरणाला नियंत्रण संपादन करणारी प्रक्रिया असे म्हंटले आहे.

ज् व्याख्या

१) जागतिक बँकेने केलेली व्याख्या :-

'व्यूक्तना किंवा गटांना आपली पसंती ठरविण्याची व ही पसंती इष्ट त्या कृतीमध्ये आणि फलप्राप्तीमध्ये उतरविण्याची क्षमता वाढविण्याची प्रक्रिया म्हणजे सक्षमीकरण होय."

२) 'महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रीने स्वत:च्या क्षमतांची ओळख करुन क्षमतांचा विकास करावयाच्या घरगुती व सामाजिक निर्णयांच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचा प्रयत्न करणे आहे."

३) 'महिला सक्षमीकरण म्हणजे आत्मविश्वासामध्ये वाढ, क्षमता-वृद्धी, सामाजिक जाणीव जागृती, कार्यात्मक साक्षरता, लिंगसमभाव, आरोग्य विषयक जाणीव, स्वत: आत्मसन्मानाने जगणे, आत्मनिर्भर व वित्तीय संस्थाबरोबर महिलांनी जोडणे होय."

४) लता बाटलीवालाच्या मते :-

'स्त्रीला सक्षम करणे ही एक प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया स्त्रीला इतर उपेक्षित घटकांना दूर ठेवण्याच्या सुव्यवस्थीत प्रवाहाचे स्वरुप बदलून न नवी दिशा देवून कृतीत आनता येते. तेव्हा प्रामुख्याने स्त्रीला सक्षम करण्यासाठी तिला शक्ती देण्याचे प्रयत्न केले गेले तरच ती अधिक गतीने प्रगत होवु शकते."

५) व्हिनेसा ग्रिफेनच्या मते :-

'स्त्रीच्या अंगी निर्णय घेण्याची नियंत्रण करण्याची, संघटन करण्याची क्षमता, मतप्रदर्शन करणे कृतीशिल कार्यक्रम घडऊन आणने, लोकसंपर्क, अर्थिक व्यवहार, आवड पूर्ण होणे यास महिला सक्षमीकरण म्हणतात."

थोडक्यात, महिला सक्षमीकरण ही प्रक्रिया स्त्रियांबद्दल सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणारी महिलांना भितीपासून मुक्त करणारी स्त्रियांमध्ये क्रांतीकारी विचार रुजवणारी, स्त्रियांना सामाजिक अर्थिक राजकीय व शौक्षणिक प्रक्रियेत सहभागी करुन घेवून त्यांना स्वावलंबी बनविणारी प्रक्रिया होय. असे म्हणता येईल.

ज् ग्रामीण महिलांची राजकीय स्थिती आणि सक्षमीकरण :-

अलीकडील काळात राजकीय दृष्टया स्त्रीयांमध्ये जागृती वाढू लागल्याने त्यांची राजकीय स्थिती आशादायक झाल्याचे चित्र दिसु लागले आहे. प्राचीन काळापासून 'चूल आणि मूल' या मर्यादीत कार्यक्षेत्रात अडकलेल्या स्त्रियांना स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतीय राज्यघटनेने दिलेल्या आरक्षणामुळे राजकीय नेतृत्त्व करण्याची संधी प्राप्त झाली आहे. त्यामुळे महिलांच्या सक्षमीकरणाला गती प्राप्त झाली. सत्ता सहभागाशिवाय कोणत्याही समुहाचे सक्षमीकरण शक्य नसते. सत्ता असेल तर माणसाला आपल्या विचारांची पेरणी करण्याला वाव मिळतो. त्यासाठी राजकीय क्षेत्रात स्त्रियांना संधी मिळाल्यास त्या नेतृत्त्व करण्यास सक्षम बनू शकतात.

पंचायत राज व्यवस्थेतील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती या त्रिस्तरीय रचनेमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण झाले. जनतेला स्थानिक प्रश्न आपल्याच पातळीवर सोडविणे शक्य झाले. ग्रामविकासाला चालना देण्यासाठी केलेल्या या प्रयत्नामुळे स्त्रियांनाही राजकीय नेतृत्त्व करण्याची संधी प्राप्त झाल्याने राजकीय दृष्टया सक्षमीकरण घडून येत असल्याचे दिसून येत आहे. आज महाराष्ट्रात ३३ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या आणि २७ हजार ८९९ ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विकास साधताना वंचीत, उपेक्षीत, दुर्लक्षीत व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांनाही नेतृत्त्व करण्याची संधी प्राप्त झाली आहे. विशेषत: महिलांसाठी राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५०ऽ आरक्षण लागू केले आहे. याशिवाय महिलांनी या संधीचा लाभ घेवून स्वबळावर आपले कर्तृत्व सिद्ध करावे व ग्रामविकासात योगदान द्यावे यासाठी 'क्रांतीज्योती' प्रकल्प हाती घेतला आहे. स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून महिलांना सामाजिक व राजकीयदृष्टया सक्षम करण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. प्रथमच निवडून आलेल्या महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि इतर महिलांनी त्यांच्यापासून प्रेरणा घेवून स्वत: पुढे यायला हवे, यासाठी प्रयत्न केले जात आहेत. ग्रामपंचायतीचा प्रत्यक्ष कारभार, ज्वलंत सामाजिक समस्या व शासकीय योजनाची माहिती देवून स्त्रियांच्या एकंदरीत व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा यावर भर दिला जात आहे.

७३ व्या घटना दुरुस्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी १/३ जागा राखून ठेवण्यात आल्या. तसेच २४ मार्च २०११ रोजी पंचायत राज संस्थामध्ये महिलांना ५०ऽ आरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला. परिणामी आज महाराष्ट्रातील काही जिल्हापरिषदेच्या अध्यक्षपदी महिलांना संधी मिळालेली दिसून येते. त्याचबरोबर महिला आरक्षणाची स्थिती पाहता समाधानकारक चित्र दिसून येते. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे देता येईल.

स्थनिक स्वराज्य संस्थाचा तपशिल.

| संस्था संख्या | एकूण सदस्य | महिला आरक्षण | |
|---|---|---|---|
| जिल्हा परिषदा | ३३ | १९५५ | ९८७ |
| पंचायत समित्या | ३५१ | ३९१० | १९५५ |
| ग्रामपंचायती | २७८९६ | १९७३३८ | ९८६६९ |

(स्त्रोत : लोकराज्य-एप्रील२०१२ माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई.)

थोडक्यात, महिला आरक्षणामुळे हजारो महिला राजकारणात सक्रिय झाल्या आहेत. त्यांना नेतृत्त्व करण्याची संधी मिळू लागल्याने महिलांचे सक्षमीकरण घडून येत आहे.

ज् ग्रामीण महिलांची सामाजिक स्थिती आणि सक्षमीकरण :-

भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान असल्यामुळे स्त्री विषयक अनेक सामाजिक समस्येत भर पडलेली दिसून येते. परंतू बदल्या परिस्थितीनुसार प्राचीन व मध्ययुगीन काळातील स्त्रियांच्या समस्या आज आढळत नाहीत. पूर्वी स्त्रीयांनी शिक्षण घेणे व नोकरी करणे गौर मानले जात. परंतू आज स्त्रीने शिक्षण व नोकरी करणे आवश्यक बनले आहे.

त्यातून आधुनिक स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावला जात आहे. समाज विकासाचा केंद्रीभूत घटक म्हणून स्त्रीकडे पाहिले जात आहे. स्त्री ही एक मौल्यवान मानव संसाधन असून देशाच्या शाश्वत विकासासाठी त्यांचा सामाजिक व आर्थिक विकास अनिवार्य आहे. भारताच्या एकुण लोकसंख्येत स्त्रियांचे एकूण प्रमाण ४८.४६ऽ एवढे आहे (जनगणना २०११). तरीपरंतू आज स्त्री पुरुष असमानता, स्त्रीभ्रुणहत्या, कौटूंबिक हिंसाचार, बलात्कार, विनयभंग यासारख्या समस्यांमुळे स्त्रियांच्या सामाजिक दर्जाला क्षती पोहंचत आहे. त्यावर उपाय म्हणून केंद्र आणि राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पावलं उचलली आहेत. त्यामध्ये पित्याच्या संपत्तीत मुलींना वाटा देणारा कायदा, स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंधक कायदा, कौटूंबिक हिंंसाचार प्रतिबंधक कायदा, बचत गटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिक तरतूद, शिक्षण आणि नोकज्यामध्ये राखीव जागांची तरतूद, बेटी बचाव बेटी पढाव योजना या सारख्या बाबींमुळे महिलांचे सामाजिकदृष्टया सक्षमीकरण घडून येत असल्याचे दिसते.

विशेषत: कौटूंबिक स्तरावरुन महिलांचे सर्वेक्षण केले असता असे दिसून आले आहे की, आज देशातील सुमारे ७५ऽ महिला आपल्या कुटुंबातील निर्णय स्वत: घेत आहेत. देशातील १३ राज्यासह केंद्रशासित प्रदेशात हा सव्र्हे घेण्यात आला तेव्हा स्त्री सक्षमीकरणाच्या अनेक बाबी प्रकाशात आलेल्या दिसून येतात. त्यानुसार गेल्या १० वर्षात विवाहीत महिलावरील अत्याचारात १६ऽ ने घट झालेली आहे. हरियाना सारख्या राज्यात अल्पवयीन मुलीचे विवाह ५०ऽ घटलेले दिसून येतात. खाजगी संपत्तीबाबत बिहारच्या महिला देशात आघाडीवर असलेल्या दिसतात. तेथे ५९ऽ महिलाकडे त्यांची संपत्ती आहे. याशिवाय कुटुंब नियोजनात हरियाणातील महिला देशात अव्वल आहेत. तेथील ३८.१ऽ महिलांनी नसबंदी केलेली आहे. पश्चिम बंगालमध्ये २९.३ऽ तर बिहारमध्ये २०.७ऽ महिलांनी नसबंदी केलेली आहे. २००५-२००६ मधील सव्र्हेत अशा हिंसाचार पिडीत महिलांची संख्या ५९ऽ होती. परंतू २०१५-२०१६ मध्ये हे प्रमाण ४३ऽ वर आले आहे. तसेच मोबाईल वापरणाज्या महिलांचे प्रमाण देखील वाढले आहे. त्यामध्ये गोवा (८१ऽ), तामिळनाडू (६२ऽ), उत्तराखंड (५५.४ऽ), हरियाणा (५०.५ऽ) एवढे प्रमाण वाढले आहे. याशिवाय बँक बचत खाते ठेवणाज्या महिलांची संख्या देखील अलीकडे तीन पटीने वाढली आहे. या बाबतीत गोव्यातील महिला ८२.८ऽ सह देशात अग्रेसर आहेत. मध्यप्रदेशात ४००ऽ ची वाढ दिसून आली. याशिवाय तामिळनाडू, हरियाणा, बिहार, महाराष्ट्र येथेही अशी वाढ दिसुन आली. (दैनिक दिव्य मराठी १ फेब्रुवारी, २०१६.)

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानामुळे स्त्रियांच्या आरोग्यविषयक निर्देशांकामध्ये सुधारणा झाली आहे. भारतात १९६१ मध्ये महिलांसाठी प्रसूती काळात हक्काची रजा व १९७६ मध्ये समान वेतन कायदा मंजूर करण्यात आला. तसेच महिलांना प्रशिक्षण व रोजगार सहाय्यता कार्यक्रम १९८७ साली सुरु करण्यात आला. त्याचबरोबर स्वयंसिद्धा व स्वाधार योजना, माहेर योजना, दत्तक पालक योजना सुरु करुन महिलांना सक्षम करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. तसेच विविध प्रकारचे कायदे करुन स्त्रियांना संरक्षण मिळवून दिले जात असल्याने सक्षमीकरणाला गती प्राप्त होत आहे.

ज् निष्कर्ष :-

१) ग्रामीण महिलांना राजकीय क्षेत्रामध्ये व शासकीय सेवेमध्ये जरी आरक्षण दिलेले असले तरी काही अपवाद वगळता स्त्रियांचा अपेक्षित असा राजकीय विकास झालेला नाही.

२) सामाजिकदृष्टया महिलांचे सक्षमीकरण होत असले तरी एकुण लोकसंख्येत लिंगगुणोत्तराचे प्रमाण विषम आहे. २०११ च्या जनगणनेनुसार मुला-मुलींचे लिंगगुणोत्तर प्रमाण ८८३ एवढे अल्प आहे. आजही अज्ञान, अंधश्रद्धा व पारंपारिकतेचा पगडा स्त्रियांवर असलेला दिसून येतो हे चिंतनीय आहे.

३) ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण होत असले तरी शौक्षणिक दृष्टीकोनातून महिलांची साक्षरता म्हणावी तेवढी वाढलेली नाही. महिला साक्षरतेचे प्रमाण ६५.४६ऽ एवढे अल्प आहे. (२०११) ग्रामीण स्त्रीनिरक्षरतेचे प्रमाण व अनुसूचित जाती-जमातीमधील स्त्रीनिरक्षरतेचे प्रमाण व अनुसूचित जाती-जमातीमधील स्त्रीनिरक्षरतेचे प्रमाण अधिक आढळते. त्यामुळे महिला सक्षमीकरणासमोर आव्हान निर्माण झाले आहे.

४) देशातील महिला आज जरी पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर असल्या व त्यांचे सक्षमीकरण होत असले तरी स्त्रियांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनलेला आहे. त्यामुळे पुर्णत: स्त्री सक्षमीकरण झाले असे म्हणत येत नाही.

ज् शिफारशी/अपेक्षा :-

१) ग्रामीण महिलांचे राजकीय सक्षमीकरण घडवून आनण्यासाठी महिलांना सर्वच पातळीवर अधिकार देणे आवश्यक आहे.

२) ग्रामीण महिलांचे सामाजिक दृष्टीकोनातून सक्षमीकरण घडवून आनण्यासाठी शासनाबरोबरच समाजातील सर्वच घटकांनी त्याला पाटींबा दिला पाहिजे व महिलांनी देखील आपली जबाबदारी ओळखून भुमिका पार पाडली पाहिजे.

३) ग्रामीण महिलांचे शैक्षणिक दृष्टिकोनातून सक्षमीकरण होण्यासाठी व स्त्री साक्षरता वाढण्यासाठी पालकांची मानसिकता बदलली पाहिजे. शासनानेही महिलांना मोफत शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

४) ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासनाने महिलांच्या सुरक्षिततेची हमी घेतली पाहिजे. त्यासंबंधीच्या कायद्याची कडक अंमलबजावणी केली गेली पाहिजे

समारोप :-

अशाप्रकारे ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण ही एक काळाची गरज बनली आहे. स्त्री आणि पुरुष हे समाजरुपी व्यवस्थेची दोन चाके आहेत. दोन्हीना समान महत्व दिले तरच समाजव्यवस्था कार्यक्षम बनेल. परिणामी राष्ट्रांचा विकास घडून येईल. म्हणून स्त्रीयांचा दर्जा सुधारण्यासाठी व त्यांना सक्षम बनविण्यासाठी शासनाचीही भुमिका महत्वपूर्ण ठरते. असे म्हणता येईल.

ज् संदर्भग्रंथ सुची :-

१) इंदू शर्मा - महिला सशक्तीकरण के नवीन आयाम - राधा पब्लिकेशन, नई दिल्ली (२०११)

२) मीना केळकर - भारतीय स्त्री संरक्षण आणि प्रतिमा - निमित्त प्रकाशन, पूणे (१९९०)

३) डॉ. शुभांगी गोटे-गव्हाणे - महिला सबलीकरण स्वरुप व समस्या - वरद पब्लिकेशन्स, औरंगाबाद (२००४)

४) डॉ. लिला पाटील - भारतीय स्त्री जीवन - मेहता पब्लिशींग हाऊस, पुणे.

५) लोकराज्य - माहिती जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई (एप्रिल २०१२)

६) दैनिक लोकमत, लोकसत्ता, दिव्यमराठी.

७) जनगणना-२०११